सुंदर साखळी

मराठी : अश्विनी बर्वे




सुंदर साखळी

"व्वा, किती सुंदर आहे!" मिस टिबैरी म्हणाल्या. जेव्हा तिच्या मांजराला सफरचंदाच्या झाडाखाली एक सुंदर साखळी सापडली. जेनियाच्या रोपांजवळचे गवत काढण्याऐवजी ती साखळी वेगवेगळ्या पोषाखावर ती घालून पहात होती. मग ती साखळी कोणी चोरून नेवू नेईल या भीतीमुळे ती रात्रभर जागी राहिली. "ही साखळी म्हणजे एक अडचणच आहे," असा विचार करून मिस. टिबैरीने ती साखळी कोणाला तरी देवून टाकली. त्याबदल्यात तिला कुत्र्याची तीन चंचल पिल्ले मिळाली. तिने पिल्लेही देवून टाकली तेव्हा तिला ओरडणारा पोपट मिळाला. तिने पोपट दिला तर तिला रंगेबेरंगी घोडा मिळाला. अशाप्रकारे रोज तिला नवीन गोष्ट मिळाली. मिस टिबैरी आता असा विचार करू लागली की, जेनियाच्या रोपांजवळचे गवत काढणे तर राहू द्या, ती आता कधी चांगली झोपू शकणार आहे की नाही?

ही सगळी चूक मांजराची होती.

अनेक वर्षोपासून मिस टिबैरी दोन शहरांच्या मध्ये असणाऱ्या दगडांच्या छोट्या घरात शांततेने राहत होती. घराच्या समोर फुलांची झाडं होती आणि घराच्या मागे भाज्या लावल्या होत्या.घराच्या एका बाजूला असलेल्या विहिरीतून स्वच्छ, निर्मळ पाणी मिळत होते आणि दुसऱ्या बाजूला लावलेल्या सफरचंदाच्या झाडांची फळे आणि सावली मिळत होती.

मिस टिबैरीजवळ ते सगळं होतं जे तिला हवं होतं आणि ज्याची तिला गरज होती..



मग एक दिवस तिच्या मांजराला वाटलं की सफरचंदाच्या झाडाखाली एक उंदीर लपला आहे. मांजराने जमीन खोदायला सुरुवात केली आणि ती खोद्तच राहिली. तिला उंदीर मिळाला नाही. पण तिला एक सुंदर साखळी मिळाली.

मिस टिबैरीने घराच्या जवळ असणाऱ्या जेनियाच्या रोपंजवळचे गवत काढायला सुरुवात केली होती, तेवढ्यात मांजराने साखळी उचलून मिस टिबैरीजवळ आणली. “हॅलो पस्स, काय घेवून आली आहे?” मिस टिबैरीने विचारले. तिने मांजराकडून साखळी घेतली, “व्वा, काय सुंदर आहे!”




मिस टिबैरी पटकन घरात गेली आणि तिने साखळी घालून पाहिली. तिच्या साधारण कपड्यांवर ती चांगली वाटत नव्हती.


एक-एक करून तिला आपले सगळे कपडे घालून पाहावे लागले. पण कशावरच ती साखळी चांगली दिसत नव्हती. “शी काय हे?” मिस टिबैरी म्हणाली.

“माझ्याजवळ एवढे सुंदर कपडे नाहीत की, ज्यावर ही साखळी मी घालू शकेल. आणि वेगवेगळे कपडे घालण्यात मी माझा सारा दिवस वाया घालवला. नाहीतर मला जेनियाच्या रोपंजवळचे गवत काढायचे होते.”

तिने साखळी टेबलावर ठेवली आणि स्वतःसाठी स्वयंपाक करू लागली. मग ती झोपण्यासाठी अंथरुणावर झोपली. तिला झोप येत होती तेवढ्यात एक विचार तिच्या मनात आला.

“काय त्रास आहे हा?” मिस टिबैरी म्हणाली. “साखळी तर टेबलवर ठेवून आले आहे. जर कोणी चोर येवून ती चोरली तर?”





ती पटकन अंथरुणातून उठली आणि टेबलाजवळ गेली. गडबडीत तिचा पाय कशाला तरी लागला. आणि तिच्या अंगठ्याला लागलं. पण साखळी टेबलवर तसेच होते.

ते घेवून मिस टिबैरीअंथरुणावर परत आली. रस्त्यात तिचे डोकं कशावर तरी आपटलं.

“इथे ठीक आहे,” मिस टिबैरी म्हणाली आणि साखळी आपल्या उशीखाली. “इथे तू नक्की सुरक्षित राहशील.” तिला झोप आली होती पण तेवढ्यात तिच्या मनात विचार आला, ती झोपल्यानंतर चोर तिच्या बेडरूम मध्ये आला आणि साखळी घेवून गेला तर? तिला ते अजिबात आवडणार नाही.

“काय त्रास आहे?” मिस टिबैरी म्हणाली. “आता मला सारी रात्र जागं राहावं लागेल.” दुसऱ्या दिवशी सकाळी मिस टिबैरी खूप थकलेली होती आणि खूप दुःखीपण होती. तिच्या पायाचा अंगठा आणि डोकं दुखत होतं “ही साखळी म्हणजे एक त्रास आहे,” ती म्हणाली. “मला ही साखळी नको, मला हिची काही गरज नाही, मी ही कोणाला देवून टाकते.”


तेवढ्यात दुधवाल्याची गाडी तिच्या घरासमोर थांबली. मिस टिबैरी पटकन बाहेर आली.

“माफ करा.” ती म्हणाली. “तुम्हांला कोणी सुंदर मुलगी माहित आहे, जिला हे सुंदर साखळी पाहिजे आहे?” दुधवाल्याने थोड्यावेळ विचार केला.

“तिकडे डाव्या बाजूला एक नगर आहे तिथे एक सुंदर मुलगी राहते,” तो म्हणाला. “मला वाटतं तिच्याजवळ साखळी नाही.”

“खूप छान,” मिस टिबैरी म्हणाली. “तू ही साखळी तिच्याकडे घेवून जा. पण तिला सांगू नको ही साखळी मी दिली ते. ती माझे आभार मानेल, ते मला आवडणार नाही. एवढच सांग,... ही भेट एका गुप्त प्रशंसकने दिली आहे.”

“ठीक आहे.” दूधवाला म्हणाला. तो निघून गेला आणि मिस टिबैरी अधिकवेळ झोपण्यासाठी आत आली.



दुसऱ्या दिवशी दुधवाला परत घराच्या समोर थांबला. “त्या सुंदर मुलीला साखळी खूप आवडली,” त्याने मिस टिबैरीला सांगितले. “ती इतकी प्रसन्न झाली की आपल्या गुप्त प्रशंसकाला साखळीच्या बदल्यात एक भेट देण्याची तिला इच्छा होती. ही ती भेट.” त्याने जमिनीवर एक टोपली ठेव्वली आणि तो निघून गेला. “हे चांगल्या जातीचे आहेत आणि खूप किंमती आहेत,” जाता-जाता वळून तो म्हणाला.

मिस टिबैरीने टोपली उघडली. त्यात तीन चंचल कुत्र्याची पिल्लं होती. “ओह नको,” मिस टिबैरी म्हणाली. दिवसभर त्या पिल्लांना जेनियाच्या रोपांजवळची माती खोदण्यापासून अडवत राहिली. दिवसभर फर्निचर चावण्यापासून त्या पिल्लांना थांबवत राहिली.

.



दुसऱ्या दिवशी ती खूप थकलेली होती आणि खूप दुःखी होती. “कृपया थांबा!” तिने हाक मारून दुधवाल्या थांबवले. खरंतर त्या दिवशी तिला दुध घ्यायचे नव्हते. “तुम्ही एखाद्या आकर्षक तरुणाला ओळखता का? ज्याला ही तीन चंचल पिल्ले आवडतील.” दुधवाल्याने काहीवेळ विचार केला.


“तिकडे उजवीकडे एक नगर आहे, तिथे एक आकर्षक तरुण राहतो,” त्याने सांगितले. “मला नाही वाटत त्याच्याकडे कुत्र्याची पिल्ले आहेत.”

“खूप छान,” मिस टिबैरी म्हणाली. “तुम्ही ह्या पिल्लांना त्याच्याकडे घेवून जा. त्याला सांगा की त्याच्या गुप्त प्रशंसकाकडून ही भेट आहे.”

“ठीक आहे,” दुधवाला म्हणाला. तो गेला आणि मिस टिबैरी उशिरापर्यंत झोपण्यासाठी आत आली.









दुसऱ्या दिवशी सकाळी दुधवाला एक मोठा डब्बा घेवून आला. डब्यात एक ओरडणारा पोपट होता. “ही एक भेट आहे,” दुधवाला म्हणाला. “त्या आकर्षक तरुणाने त्याच्या गुप्त प्रशंसकाला दिली आहे.”

“अरे नको,” मिस टिबैरी म्हणाल्या. दिवसभर पोपट तिच्याशी आंधळी कोशिबीर खेळत होता. रात्रभर तो गाणं गात होता, पण तो चांगलं गात नव्हता.






दुसऱ्या दिवशी सकाळी मिस टिबैरी खरच खूप थकली होती आणि दुःखी सुद्धा होती. मग परत एकदा तिने दुधवाल्याला थांबवले. “कृपया या पोपटाला त्या सुंदर मुलीजवळ घेवून जा,” ती म्हणाली.


“मला माहित आहे,” दुधवाला म्हणाला, “तिला सांगायचे की ही भेट गुप्त प्रशंसकने पाठवली आहे.”

“अगदी बरोबर,” मिस टिबैरी म्हणाल्या.



दुसऱ्या दिवशी दुधवाला एक रंगेबेरंगी घोडा घेवून आला. “मला माहित आहे,” मिस टिबैरी म्हणाल्या. “ही भेट त्या सुंदर मुलीने पाठवली आहे.”

“अगदी बरोबर,” दूधवाला म्हणाला.




त्या दिवशी घोड्याने गाजराची सगळी पानं खाल्ली.




त्या रात्री घोड्याने झाडावरची सगळी सफरचंदं खाल्ली.
मिस टिबैरी रात्रभर त्याच्या खाण्याचा आवाज ऐकत राहिली.

सकाळी तिने तो घोडा दुधवाल्याबरोबर
त्या आकर्षक तरुणाला पाठवून दिला.







कितीतरी दिवस ही देवाणघेवाण चालूच राहिली.
आकर्षक तरुणाने तीन खोडकर मेंढ्या पाठवल्या.




सुंदर मुलीने तीन मोठे ताजे डुक्कर पाठवले.



आकर्षक तरुणाने हंसाचा कळप पाठवला.



सुंदरमुलीने एक बैल पाठवला, ज्याच्या केसात पिसवा होत्या.



मिस टिबैरीला वाटले की ती आता वेडी होईल.

दूधवाला त्रासून गेला होता.

“मला खूप वाईट वाटते,” एका सकाळी त्याने बैलाला आपल्या दुधाच्या बाटल्यांच्या गाडीत ढकलत म्हटले, “ही देवाणघेवाण संपली पाहिजे.”



“मी सहमत आहे,” मिस टिबैरी म्हणाल्या. “तुम्ही बैलाला घेवून जा आणि मी दुसरा काही उपायाचा विचार करते.” पण ती इतकी थकली होती की काहीही विचार करणे अशक्य होते. पण तरीही तिने प्रयत्न करून एखादी युक्ती सुचेपर्यत तिने आपले डोळे उघडे ठेवले. मग ती उशिरापर्यंत आरामात झोपली.दुसऱ्या दिवशी तिने दुधवाल्याला दोन पत्रे दिली. एक पत्र सुंदर मुलीला, जी उजव्या नगरात राहत होती. दुसरे पत्र त्या आर्कषक तरुणाला जो डाव्याबाजूच्या नगरात राहत होता. त्यात लिहले होते: कृपया रात्री नऊ वाजता दोन्ही नगरांच्या मध्ये असणाऱ्या छोट्या दगडी घराकडे भेट.


गुप्त प्रशंसक



नऊ वाजले आणि मिस टिबैरी, आपल्या घराच्या कोपऱ्यातून सफरचंदाच्या झाडाकडे डोकावून पाहू लागली. ते दोघे तेच होते- सुंदर मुलगी आणि आर्कषक तरुण. त्याचवेळी दोघांमध्ये प्रेम जमलं.

मिस टिबैरी विवाहात सामील झाली नाही. ती घरातच राहिली आणि जेनियाच्या रोपामाध्ले गवत काढू लागली. पण दुधवाला लग्नाला गेला आणि त्याने खूप मजा केली.

मांजराने पण मजा केली.



समाप्त